**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416004 MAHARASHTRA**
**PHONE: EPABX 0231- 260900 FAX : 0091 - 2690655**
शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर –
Website : www.unishivaji.ac.in E – mail : exam.godown@unishivaji.ac.in
दुरध्वनी : परीक्षा गोडावून विभाग ०२३१ - २६०९३४५ / २६०९११४

NACC 'A' Grade MHRD-NIRF 28th Rank

Ref.No S.U./Exam Godown/1777 Date : 19 /07/2017
संदर्भ क्र: शिवाजी वि/परीक्षा गोडावून /

प्रति,

1. मा. प्राचार्य,/संचालक,
   सर्व संलग्नित महाविद्यालये,
2. मा. अधिविभाग प्रमुख,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :– ऑक्टोंबर /नोव्हेंबर 2017 परीक्षेसाठी आवश्यक उत्तरपत्रिका व इतर स्टेशनरीची (परीक्षा साहित्य) माहिती online पाठविणेबाबत.

महोदय,/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ व महाविद्यालयीन पातळीवर ऑक्टोंबर /नोव्हेंबर 2017 मध्ये होणा–या परीक्षेकरीता आपल्या महाविद्यालयासाठी आवश्यक को–या उत्तरपत्रिका (काळया व केशरी रंगाच्या) व इतर स्टेशनरीची मागणी आपल्या महाविद्यालयामार्फत करण्यात येते. सदर माहिती भरणेकरीता http://online.shivajiuniversity.in/ या वेब पेजवर College/University portal या सदरात Stationary Demand Note या बटनाव्दारे तसेच http://ele2015.unishivaji.ac.in/Godown/CollegeLogin.aspx या लिंक मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. **University Exam व College Exam दोन्हीची माहिती भरल्यानंतर खात्रीकरून Confirm करावी.** तसेच Print Report वर मा. प्राचार्य यांची सही घेवून सदर कॉपी स्कॅन करून गोडावून विभागाच्या ई–मेलवर पाठवावी [E-mail- exam.godown@unishivaji.ac.in ]. उत्तरपत्रिका आणि स्टेशनरीची माहिती पाठवितांना खालील बाबींची पुर्तता करून दि. 31/07/2017 अखेर माहिती online पाठवावी.

1. सदरची माहिती भरण्यासाठी महाविद्यालयांना Exam Forms भरणेसाठी देण्यात आलेला युजरनेम व पासवर्ड वापरता येईल.
2. उत्तरपत्रिका व स्टेशनरीची माहिती online पाठविल्यानंतरच आपणास स्टेशनरी उपलब्ध करून देण्यात येईल.
3. येणा–या परीक्षेसाठी लागणा–या उत्तरपत्रिका व स्टेशनरी मागणीसाठी आपले महाविद्यालयात असलेल्या एकूण शिल्लक स्टेशनरीमधून शिल्लक असणा–या उत्तरपत्रिका व स्टेशनरी वजा करून उर्वरीत उत्तरपत्रिका व स्टेशनरीची मागणी करावी. शिल्लक स्टेशनरी प्रथम वापरावी त्यानंतरच नवीन स्टेशनरी वापरासाठी घ्यावी.

4. प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका कागदी लखोटयातच देणेत याव्यात. त्याकरीता कापडी पिशवी वापरण्यात येऊ नये. (बरीच महाविद्यालये सदर सूचना सांगूनही कागदी लखोटयात न देता कापडी पिशवीतून प्रात्यक्षिक साहित्य देतात. तरी प्रात्यक्षिक साहित्य हे कागदी लखोटयातून देणेत यावे.)
5. महाविद्यालयाकडून कापडी पिशव्या बाबत लेखी मागणी केलेनंतर शिल्लक असलेल्या प्रमाणात त्या देणेत येतील या करीता तोंडी मागणी विचारात घेतली जाणार नाही.
6. उत्तरपत्रिकांच्या नोंदीसाठी वेगवेगळया नोंदवहया ठेवाव्यात. उदा. उत्तरपत्रिका जमा खर्च नोंदवही, उत्तरपत्रिका ताब्यात दिल्याचे व परत मिळाल्याचे नोंदवही, सदर नोंदवहीवर दरदिवशीच्या सुरवातीच्या शिल्लक उत्तरपत्रिकांची संख्या, दिवसभरामध्ये वापरलेल्या उत्तरपत्रिकांची संख्या व दिवसाअखेर वापरलेल्या व शिल्लक उत्तरपत्रिकेची संख्या यांचा तपशील नोंदवने आवश्यक आहे. सदर तपशील महाविद्यालयाला भेट देणारे भरारी पथक, विशेष पथक, विद्यापीठीय अधिकारी यांना दाखविणे आवश्यक आहे.
7. काहीवेळेला उत्तरपत्रिकांचा अनुक्रमांक व पाननंबर छपाई न झाल्याचे निदर्शनास आले आहे यासाठी परीक्षा केंद्रावरील ब्लॉकवर उत्तरपत्रिका देण्यापुर्वी त्यावरील अनुक्रमांक व पाननंबर परीक्षेपुर्वी तपासावेत म्हणजे ऐनवेळी परीक्षा सुरू असतानां त्रास न होता परीक्षा सुरळीत पार पडतील.
8. परीक्षा संपल्यानंतर आपल्या केंद्रावर शिल्लक राहीलेल्या उत्तरपत्रिका व स्टेशनरी व्यवस्थित जतन करून ठेवाव्यात. सदर उत्तरपत्रिका व स्टेशनरी पुढील परीक्षेसाठी वापरावी.
9. विद्यापीठ परीक्षेसाठी मागणी केलेल्या को–या उत्तरपत्रिका व स्टेशनरी सध्या वापरात नसल्यास त्याची परस्पर विल्हेवाट न लावता विद्यापीठाकडे परत देणेसाठी लेखी कळवावे.
10. महाविद्यालयाने परीक्षेसाठी लागणा–या उत्तरपत्रिका आणि स्टेशनरी संख्येची खात्री करून बिनचूक मागणी करावी. मागणी आवश्यकतेपेक्षा खूपच कमी अथवा खूप जास्त असता कामा नये.
11. परीक्षा चालू असतांना वेळोवेळी शिल्लक स्टेशनरीचा आढावा घ्यावा. परीक्षेकरीता उत्तरपत्रिकेचा साठा कमी पडल्यास आपल्या महाविद्यालयाने विद्यापीठात प्रत्यक्ष येवून स्टेशनरी घेवून जावी. त्याकरीता विद्यापीठाचे स्वतंत्र वाहन पाठविण्यात येणार नाही.

अधिक माहितीकरीता खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

1. गोडावून विभाग (परीक्षा) अधिक्षक– 0231–2609114 / 2609345

तेव्हा वरील सूचना आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणाव्यात व ऑक्टोंबर /नोव्हेंबर 2017 मध्ये होणा–या परीक्षेच्या आयोजनासाठी माहिती **दि. 31/07/2017** अखेर **online** पध्दतीने पाठविण्यात यावी. माहिती उपलब्ध न झाल्यास आपल्या महाविद्यालयाकडे पुढील परीक्षा घेणेसाठी उत्तरपत्रिकांचा पुरेसा साठा शिल्लक आहे असे गृहीत धरण्यात येईल याची नोंद घ्यावी ही विनंती कळावे.

आपला विश्वासू

PSPandre

उपकुलसचिव

(परीक्षा विभाग–पोस्टएक्झाम)